# दिनांक ०६.१०.२०२२ रोजी च्या आढावा बैठकीचे इतिवृत्त

मा. संचालक याच्या अध्यक्षेतेखाली दिनांक ०६.१०.२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता Google meet व्दारे सर्व विभागीय सहसंचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा, सर्व जिल्हा सहाय्यक संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्या समवेत online आढावा बैठक घेण्यात आली. सदर online बैठकीसाठी संचालक यांच्या दालनात श्रीमती राजश्री ठोकळ, सहसंचालक (प्रभारी), श्रीमती सुप्रिया जाधव ,सहाय्यक संचालक (प्रशासन) तसेच श्रीमती रोशनी रसाळ, लेखाधिकारी हे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीस १४ व १५ व्या वित्त आयोगांतर्गत ग्रामपंचायतींना वितरीत निधीचे सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ चे Audit Online तसेच ग्रामनिधी लेखापरीक्षणाचे ९७.५ % उद्दिष्ट पूर्ण केल्याबद्दल सर्व विभागीय सहसंचालक व जिल्हा सहाय्यक संचालक, सर्व जिल्हालेखापरीक्षा अधिकारी, सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी, वरीष्ठ लेखापरीक्षक व कनिष्ठ लेखापरीक्षक तसेच कर्मचारी यांचे संचालक यांनी अभिनदन केले.

बैठकीच्या अनुषंगाने विवरणपत्रामध्ये नमूद केलेल्या ६ मुद्दयांबाबत सर्व विभागीय सहसंचालक व जिल्हा सहाय्यक संचालक यांचा लेखापरीक्षण विषयक कामकाजाचा आढावा घेण्यात आला व त्यामध्ये खालीलप्रमाणे निर्देश दिले.

१. राजीव गांधी प्रशासकीय गतीमानता अभियान :-

I. संचालनालयाच्या सर्व विभागीय सहसंचालक व सर्व जिल्हा सहाय्यक संचालक यांनी राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानामध्ये सहभाग नोंदणी करुन कार्यालयीन वातवरण सुधारणा व स्वच्छता मोहिमेचा आढावा संचालक यांनी घेतला. तथापी काही जिल्हा कार्यालयांनी सहभाग नोंदणी न केल्याचे निदर्शनास आले. त्यानुषंगाने ज्या कार्यालयानी अदयापपर्यत अभियानामध्ये सहभाग नोंदविला नसल्यास अशा कार्यालयांनी तात्काळ दिनांक ०७.१०.२०२२ रोजी नोंदणी करणेबाबत संचालक यांनी निर्देश दिले. तसेच शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र .प्र .सुधा १११९ / प्र.क्र. ३/ १८ अ,

दि०३.०२.२०२१ मधील मुद्दा क्रमांक ४ मध्ये नमूद केलेल्या ७ मुद्दयांची पूर्तता करणेबाबत. संचालक यांनी निर्देश दिले.

II. जिल्हा सहाय्यक संचालक यांनी राजीव गांधी स्वच्छता अभियान मोहिमेतील सहभागाकरीता केलेल्या online activities सर्व विभागीय सहसंचालक व जिल्हा सहाय्यक संचालक यांना अंमलबजावणी करिता संचालनालयाच्या www.mahalfa.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी संचालनालयास सादर कराव्यात.

III. विभागीय सहसंचालक पुणे यांनी आरोग्य शिबिर घेतले होते. त्याप्रमाणे इतर विभागीय सहसंचालक यांनी देखील सदर चा उपक्रम राबवावा.

IV. विभागीय सहसंचालक नागपूर व जिल्हा सहाय्यक संचालक भंडारा यांनी स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागासाठी नवीन चिन्ह (Logo) प्रस्तावित केले आहे. या नाविन्यपूर्ण उपक्रमाबाबात मा. संचालक यांनी त्यांचे अभिनंदन केले तसेच सर्व विभागीय कार्यालयाकडून व जिल्हा सहाय्यक संचालक कार्यालयाकडून सदर चिन्हाबाबतचे अभिप्राय दिनांक १०.१०.२०२२ पर्यत कळविणेबाबत संचालक यांनी निर्देश दिले आहेत.

२. ग्रामपंचायत/नगरपरिषद/नगरपंचयात लेखापरीक्षण सदयस्थिती तसेच पुनर्विलोकन अहवालाबाबत:-

बैठकीमध्ये मा. संचालक यांनी सर्व विभागीय सहसंचालक व जिल्हा सहाय्यक संचालक यांच्या समवेत चर्चा करुन ग्रामपंचायत /नगरपरिषद/नगरपंचायत लेखापरीक्षण सदयस्थितीचा पुढीलप्रमाणे आढावा घेतला.

## सहसंचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोंकण विभाग

| अ.क्र. | जिल्हा | राजीव गांधी अभियानात सहभाग | ग्रांपचायत लेखापरीक्षण | | नगरपरिषद पुनर्विलांकन अहवाल (सन २०१५-१६ ते२०१८-१९ ) | | नगरपरिषद /नगरपंचायत लेखापरीक्षणाची सदयस्थिती | | | जिल्हापरिषद/पंचायत समिती लेखापरीक्षण सुरु करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | AOL (% मध्ये ) | ग्रामनिधी चे अहवाल निर्गमन ( % मध्ये ) | एकूण प्रस्तावित परिच्छेद संख्या | अनुपालन प्राप्त संख्या | नगरपरिषद /नगरपंचायत (एकूण घटक) | सदयस्थिती | लेखापरीक्षण पूर्ण होण्याचा कालावधी/दिनांक | |
| १ | ठाणे | सहभाग नोंदविला | ९८ | ९५ | २२८ | ९२ | ४ | २ न.प. पूर्ण २ प्रगतीत . | माहे ऑक्टोबर २०२२ अखेर | दिनांक ०१.११.२०२२ |
| २ | पालघर | | ९९ | ७२(उर्वरित १५.१०.२०२२ पर्यत पूर्ण होईल. | १९२ | ५७ | ७ | १ न प पूर्ण उर्वरित ६ प्रगतीत | दि.२१/१०/२०२२ | दिनांक ०१.११.२०२२ |
| ३ | रायगड | | ९८ | ६९ | ६११ | २२६ | १६ | ५ पूर्ण ९ प्रगतीत न.पंचायत /नगरपरिषद प्रत्येकी १ प्रलंबित | माहे ऑक्टोबर २०२२ अखेरपर्यत . | दिनांक १०.११.२०२२ |
| ४ | रत्नागिरी | | १०० | १०० | २२९ | १२८ | ९ | ८ पूर्ण व १ प्रलंबित | माहे ऑक्टोबर २०२२ अखेरपर्यत | दिनांक १५.१०.२०२२ |
| ५ | सिंधुदुर्ग | | १०० | १०० | २२३ | ११५ | ८ | ६ पूर्ण २ प्रगतीत | माहे ऑक्टोबर २०२२ अखेरपर्यत | दिनांक ०१.११.२०२२ |

| | | सहसंचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा, नाशिक विभाग | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | राजीव गांधी अभियानात सहभाग | ग्रांपचायत लेखापरीक्षण | | | नगरपरिषद पुनर्विलांकन अहवाल (सन २०१५-१६ ते२०१८-१९) | | नगरपरिषद /नगरपंचायत लेखापरीक्षणाची सदयस्थिती | | | जिल्हापरिषद/ पंचायत समिती लेखापरीक्षण सुरु करण्याचा दिनांक |
| | | | AOL( % मध्ये ) | ग्रामनिधी चे अहवाल निर्गमन ( % मध्ये )अहवाल निर्गमन कार्यवाही पूर्ण होण्याचा दिनांक | | एकूण प्रस्तावित परिच्छेद संख्या | अनुपालन प्राप्त संख्या | नगरपरिषद /नगरपंचायत (एकूण घटक) | सदयस्थिती | लेखापरीक्षण पूर्ण होण्याचा कालावधी/दिनांक | |
| १ | नाशिक | सहभाग नोंदविला | १०० | ५१ | माहे ऑक्टोबर २०२२ अखेर | ४२९ | १४९ | १६ | ७ प्रगतीत | उर्वरित माहे नोव्हेंबर २०२२ अखेरपर्यत | दि ०१.१२.२०२२ |
| २ | धुळे | सहभाग नोंदविला | १०० | ४५ | माहे ऑक्टोबर २०२२ अखेर | ८७ | २६ | १२ | ६ घटकांचे लेखापरीक्षण सुरु आहे | दि.३१.१२.२०२२ | दि.१५.११.२०२२ |
| ३ | जळगाव | सहभाग नोंदविला | ९१ | २० | दि.१५ .११.२०२२ | १८२ | ११ | १९ | ५ प्रगतीत | उर्वरित माहे डिसेंबर २०२२ अखेर पूर्ण होईल | दि ०१.०१.२०२३ |
| ४ | अहमदनगर | प्रस्ताव सादर करावा | ९२ | ४२ | दि.१५ .११.२०२२ | ४१७ | १०३ | १५ | २ पूर्ण ८ प्रगतीत ५ प्रलंबित | दि.१५.११ २०२२ | दि.१६.११.२०२२ |
| ५ | नंदूरबार | प्रस्ताव सादर करावा | १०० | १०० | | ७५ | २१ | ५ | १पूर्ण ३ प्रगतीत १ प्रलंबित | रिक्त पदे आहेत. | ---------- |

| | | सहसंचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा,पुणे विभाग | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | राजीव गांधी अभियानात सहभाग | ग्रांपचायत लेखापरीक्षण | | | नगरपरिषद पुनर्विलांकन अहवाल (सन २०१५-१६ ते२०१८-१९) | | नगरपरिषद /नगरपंचायत लेखापरीक्षणाची सदयस्थिती | | | जिल्हापरिषद/पंचायत समिती लेखापरीक्षण सुरु करण्याचा दिनांक |
| | | | AOL( % मध्ये ) | ग्रामनिधी चे अहवाल निर्गमन ( % मध्ये )अहवाल निर्गमन कार्यवाही पूर्ण होण्याचा दिनांक ) | | एकूण प्रस्तावित परिच्छेद संख्या | अनुपालन प्राप्त संख्या | नगरपरिषद /नगरपंचायत (एकुण घटक) | सदयस्थिती | लेखापरीक्षण पूर्ण होण्याचा कालावधी /दिनांक | |
| १ | पुणे | सहभाग नोंदविला | ९५ | ७० | दि.३१.१०.२०२२ | २७५ | ४८ | १६ | ८ पूर्ण ५ प्रगतीत ३ प्रलंबित | दि. २५.११.२०२२ | दि. १५.११.२०२२ |
| २ | सातारा | | ९८ | ७८ | दि२०.१०.२०२२ | ३५६ | १० | १६ | ३ पूर्ण ७ प्रगतीपथावर ६ प्रलंबित | दि.२५.११.२०२२ | दि. ०१.१२.२०२२ |
| ३ | सांगली | | १०० | ७० | दि३१.१०.२०२२ | २२९ | निरंक | ९ | ३ पूर्ण ५ प्रगतीपथावर आहेत १ प्रलंबित | दि.२५.११.२०२२ | लेखापरीक्षण सुरु केले आहे. |
| ४ | कोल्हापूर | | १०० | ९६ | दि३१.१०.२०२२ | २५५ | ७६ | १४ | ५ पूर्ण ५ प्रगतीत व ४ सुरु करण्यात आल्या आहेत | दि. १५.११.२०२२ | दि. १५.११.२०२२ |
| ५ | सोलापूर | | ९७ | १०० | | २०७ | निरंक | ३९ | ७ प्रगतीत | दि.३१.१०.२०२२ | दि.०१.११.२०२२ |

| | | | सहसंचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा,अमरावती विभाग | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | राजीव गांधी अभियानात सहभाग | ग्रांपचायत लेखापरीक्षण | | | नगरपरिषद पुनर्विलांकन अहवाल (सन २०१५-१६ ते२०१८-१९) | | नगरपरिषद /नगरपंचायत लेखापरीक्षणाची सदयस्थिती | | | जिल्हापरिषद/ पंचायत समिती लेखापरीक्षण सुरु करण्याचा दिनांक |
| | | | AOL (% मध्ये ) | ग्रामनिधी चे अहवाल निर्गमन ( % मध्ये )अहवाल निर्गमन कार्यवाही पूर्ण होण्याचा दिनांक) | | एकूण प्रस्तावित परिच्छेद संख्या | अनुपालन प्राप्त संख्या | नगरपरिषद /नगरपंचायत (एकूण घटक) | सदयस्थिती | लेखापरीक्षण पूर्ण होण्याचा कालावधी /दिनांक | |
| १ | अमरावती | सहभाग नोंदविला | ९९ | ५१ | दि३१.१०.२०२२ | ३७७ | २८ | १४ | २ पूर्ण १२ प्रगतीत | दि.१५.११.२०२२ | दि.०१.११.२०२२ |
| २ | अकोला | प्रस्ताव सादर करावा | ९५ | ५० | दि३१.१०.२०२२ | १८२ | ४ | ६ | २पूर्ण ३ प्रगतीत १ सुरुवात केली आहे. | दि.१०.११.२०२२ | दि.०१.११.२०२२ |
| ३ | बुलढाणा | सहभाग नोंदविला | १०० | ६१ | दि३१.१०.२०२२ | २६१ | ४७ | १३ | ३ पुर्ण ६ प्रगतीत ४ प्रलंबित | दि.३०.११.२०२२ | दि.१५.११.२०२२ |
| ४ | यवतमाळ | सहभाग नोंदविला | ८७ | ३४ | दि१५.११. २०२२ | ३७० | १९१ | १६ | २ पूर्ण ४ प्रगतीत | दि.३०.११.२०२२ | दि. ०१.१२.२०२२ |
| ५ | वाशिम | प्रस्ताव सादर करावा | ९८ | ३२ | दि३१.१०.२०२२ | २६५ | १४६ | ५ | १ पूर्ण ३ प्रगतीत १ प्रलंबित | दि.३१.१२.२०२२ | दि०१.०१.२०२३ |

## सहसंचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा,औरंगाबाद विभाग

| अ.क्र. | जिल्हा | राजीव गांधी अभियानात सहभाग | ग्रांपचायत लेखापरीक्षण | | | नगरपरिषद पुनर्विलांकन अहवाल (सन २०१५-१६ ते२०१८-१९) | | नगरपरिषद /नगरपंचायत लेखापरीक्षणाची सदयस्थिती | | | जिल्हापरिषद/ पंचायत समिती लेखापरीक्षण सुरु करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | AOL ( % मध्ये ) | ग्रामनिधी चे अहवाल निर्गमन ( % मध्ये )अहवाल निर्गमन कार्यवाही पूर्ण होण्याचा दिनांक) | | एकूण प्रस्तावित परिच्छेद संख्या | अनुपालन प्राप्त संख्या | नगरपरिषद /नगरपंचायत (एकूण घटक) | सदयस्थिती | लेखापरीक्षण पूर्ण होण्याचा कालावधी/दिनांक | |
| १ | औरंगाबाद | सहभाग नोंदविला | ९७ (Technical Mapping issue) | ९८ | दि.१४.१०.२०२२ | २२९ | ५ | ८ | ८ पूर्ण | -------- | १५ सप्टेंबर २०२२ रोजी सुरु केले आहे. |
| २ | लातूर | सहभाग नोंदविला | १०० | ८० | दि.३१.१०.२०२२ | २६३ | निरंक | ९ | ३ पूर्ण उर्वरित प्रगतीपथावर आहेत | दि.३१.१०.२०२२ | दि. १०.१०.२०२२ |
| ३ | बीड | सहभाग नोंदविला | ९३ (तांत्रिक अडचणी) | ७० | दि.१०.११.२०२२ | २९७ | निरंक | ११ | ७ पूर्ण ४ प्रगतीत आहे | दि. १५.११.२०२२ | दि.३१.१२.२०२२ |
| ४ | उस्मानाबाद | सहभाग नोंदविला | ९५ | ९८ | दि.१५.१०.२०२२ | १९० | निरंक | ११ | ५ प्रगतीत ६ प्रलंबित | दि. ३०.११.२०२२ | दि.२८.११.२०२२ |
| ५ | हिंगोली | सहभाग नोंदविला | ९८ | ८७ | दि.२०.१०.२०२२ | १५२ | निरंक | ५ | ४ प्रगतीत १ प्रलंबित | दि. ३०.११.२०२२ | दि.०६.१२.२०२२ |
| ६ | जालना | सहभाग नोंदविला | ९६ | १०० | | १७४ | निरंक | ८ | ७ पूर्ण १ प्रगतीत | दि. १७.१०.२०२२ | दि.१८.१०.२०२२ |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | परभणी | सहभाग नोंदविला | ९१ | १०० | २३१ | निरंक | ८ | ४ पूर्ण ३ प्रगतीत | दि.१०.११.२०२२ | दि.०६.१०.२०२२ |
| ८ | नांदेड | प्रस्ताव सादर करावा | ९३ | १०० | ३०९ | ७ | १८ | १४ पूर्ण ४ प्रगतीत | दि.२०.१०.२०२२ | दि.१३.१०.२०२२ |

## सहसंचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा,नागपूर विभाग

| अ.क्र. | जिल्हा | राजीव गांधी अभियानात सहभाग | ग्रांपचायत लेखापरीक्षण | | | नगरपरिषद पुनर्विलांकन अहवाल (सन २०१५-१६ ते२०१८-१९) | | नगरपरिषद /नगरपंचायत लेखापरीक्षणाची सदयस्थिती | | | जिल्हापरिषद/ पंचायत समिती लेखापरीक्षण सुरु करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | AOL( % मध्ये ) | ग्रामनिधी चे अहवाल निर्गमन ( % मध्ये )अहवाल निर्गमन कार्यवाही पूर्ण होण्याचा दिनांक ) | | एकूण परिच्छेद संख्या | अनुपालन प्राप्त संख्या | नगरपरिषद /नगरपंचायत (एकूण घटक) | सदयस्थिती | लेखापरीक्षण पूर्ण होण्याचा कालावधी/दिनांक | |
| १ | नागपूर | सहभाग नोंदविला | १०० | ४६ | दि.१५.११.२०२२ | ४६० | ११ | २० | २ पूर्ण ५ प्रगतीत १३ प्रलंबित | दि.३१.१२.२०२२ | दि. ०१.१२.२०२२ |
| २ | भंडारा | सहभाग नोंदविला | १०० | ३७ | दि.१५.११.२०२२ | २१५ | निरंक | ११ | ४ सुरु आहेत ४ प्रगतीत आहेत ३ प्रलंबित आहेत | दि.३१.१२.२०२२ | दि.०१.१२.२०२२ |
| ३ | चंद्रपूर | सहभाग नोंदविला | ८६ | २९ | दि.१५.११.२०२२ | ५०२ | १७६ | १७ | १ पूर्ण ७ प्रगतीत ९ प्रलंबित | दि.१९.१२.२०२२ | दि १९.०१.२०२३ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | गडचिरोली | सहभाग नोंदविला | १०० | ५० | दि.१५.११.२०२२ | ३८४ | २० | १२ | २ पूर्ण ,५ प्रगतीत व ५ प्रलंबित | दि.१५.११.२०२२ | दि.०६.१२.२०२२ |
| ५ | गोंदिया | सहभाग नोंदविला | १०० | ५८ | दि.१५.११.२०२२ | २४५ | निरंक | ८ | ४ पूर्ण ३प्रगतीत १ प्रलंबित | दि.१५.११.२०२२ | दि०७.१०.२०२२ रोजी लेखापरीक्षण सुरु केले आहे. |
| ६ | वर्धा | प्रस्ताव सादर करावा | १०० | १५ | दि.२४.११.२०२२ | ३८४ | निरंक | १० | २ पूर्ण ४ प्रगतीत १ सुरु आहे ( उर्वरित ३ नियोजन केले आहे) | दि.१०.१२.२०२२ | दि.१५.१२.२०२२ |

| अ.क्र. | कृषी विदयापीठांची नावे | कृषी विदयापीठांमधील लेखापरीक्षणाबाबतची सदयस्थिती |
|---|---|---|
| १ | डॉ बाळासाहेब सांवत कृषी विदयापीठ, दापोली | सन २०१८-२०१९ पूर्ण , सन २०१९-२०२० प्रगतीत |
| २ | महात्मा फुले, कृषी विद्यापीठ, राहुरी,अहमदनगर. | सन २०१९-२०२० पूर्ण , सन २०२०-२०२१ प्रगतीत |
| ३ | वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी | सन २०१९-२०२० पूर्ण , सन २०२०-२०२१ प्रगतीत |
| ४ | डॉ पंजाबराव देशमुख कृषी विदयापीठ, अकोला | सन २०१७-२०१८ व २०१८-२०१९ प्रगतीत |

**उपरोक्त विवरणपत्राचे अवलोकन केले असता मा. संचालक यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.**

I. विभागीय कार्यालय कोंकण,पुणे , नाशिक व औरंगाबाद विभाग यांनी माहे ऑक्टोबर२०२२ अखेर तसेच विभागीय कार्यालय अमरावती व नागपूर यांनी १५ नोव्हेंबर २०२२ पर्यंत शासन निर्देशानुसार Audit online चे १००% उद्दिष्टये पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात यावा .

II. संगणकप्रणालीवर काम करत असताना तांत्रिक अडचणी असल्यास सर्व विभागीय सहसंचालक व सर्व जिल्हा सहाय्यक संचालक यांनी एकमेकांशी समन्वय साधून सदर अडचणीचा निपटारा करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावा. तसेच AOL या संगणकप्रणालीवर काम करीत असताना येणा-या तांत्रिक अडचणीबाबतचा अहवाल संचालनालयास पाठवावा संचालनालयातील संगणक शाखेने NIC,दिल्ली कार्यालयाशी समन्वय साधून सदर अडचणीबाबत पाठपुरावा करावा.

III. सर्व विभागीय सहसंचालक यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या ज्या ग्रामपंचायतींची लेखापरीक्षण अहवाल मोठया प्रमाणत प्रलंबित आहेत त्याबाबत त्यांनी स्वत: लक्ष देऊन अहवाल विहित वेळेत निर्गमित होतील याची दक्षता घ्यावी. तसेच उपरोक्त विवरणपत्रात सर्व जिल्हा सहाय्यक संचालक यांनी प्रलंबित लेखापरीक्षण पूर्ण करणेबाबत दिलेल्या दिनांक/कालावधीत प्रलंबित लेखापरीक्षण पूर्ण होण्यासाठी संनियंत्रण ठेवावे.

IV. विभागीय आयुक्त कोंकण विभाग यांनी त्यांचे विभागातील संस्थांमध्ये स्वत: लक्ष देऊन नगरपालिका आणि नगरपंचायतींचे प्रलंबित परिच्छेदांचे निपटाराबाबत कार्यवाही केली आहे. त्यानुषंगाने इतर विभागीय सहसंचालक कार्यालयांनी देखील त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**३. आस्थापना विषयक बाबी:-**

I. प्रशासकीय तपासणी सूची अदयावत करुन सर्व विभागीय सहसंचालकांनी त्यांच्या अधिनस्त असलेलया जिल्हा कार्यालयांची प्रत्येक वर्षी प्रशासकीय तपासणी करण्यात यावी. प्रशासकीय तपासणीबाबतचा अहवाल प्रशासनिक दौ-यांसोबत सादर करावा.

II. विभागीय सहसंचालक यांनी त्यांचे कार्यालयामध्ये विशेष लेखापरीक्षणबाबतची तसेच भार अधिभार प्रकरणांची नोंदवही तयार करुन सदर नोंदवही वेळोवेळी अद्ययावत ठेवावी.

III. स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाकडील वरीष्ठ लेखापरीक्षक पदोन्नती घेत नसल्याचे निर्देशनास येत आहे. त्यानुषंगाने सर्व विभागीय सहसंचालक व जिल्हा सहाय्यक संचालक यांनी संबंधित कर्मचा-यांचे प्रबोधन करावे. तसेच यावर्षीपासून " उत्कृष्ट कर्मचारी " यांचे विभागीय स्तरावर नियोजन करण्यात यावे.

IV. शिपाई व वाहनचालक यांचे प्रस्ताव निकाली काढावेत.

## ४. ऐनवेळी बैठकीत उपस्थित झालेल्या मुद्देबाबत

I. नगरपालिका जितूर ने ३१ मार्च २०२२ अखेरची रोखवहीमध्ये नोंदी न घेतल्यामुळे व अद्ययावत नसल्यामुळे लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करुन दिले नाहीत असे जिल्हा सहाय्यक संचालक,श्री प्रकाश दासे यांनी सांगितले त्यानुषंगाने मा. संचालक यांनी जिल्हा सहाय्यक संचालक परभणी यांनी सदर प्रकरणी संचालनालयास प्रस्ताव सादर करणेबाबत सांगितले व विभागीय सहसंचालक, औरंगाबाद यांनी नगरपालिका जितूर येथे भेट देवून प्रस्तुत प्रकरणी विशेष अहवाल तयार करुन संबंधित विभागीय आयुक्त यांना कळवावे.

II. नगरपरिषद देऊळगाव राजा,बुलढाणाबाबत श्री चंद्रकांत खरात यांचे वारंवार प्राप्त होणा-या तक्रारीच्या अनुषंगाने सहसंचालक अमरावती यांनी सदर नगरपरिषदेस भेट देऊन वस्तुनिष्ठ अहवाल संचालनालयास सादर करावा.

III. नगरपंचायत भडगाव जळगावचे मागील ३ वर्षाचे लेखापरीक्षण चालू असून तिथे अनियमितता व अपहार आढळला आहे. सदर अनियमिततेबाबत तपासणी करुन परिच्छेद नोंदविण्याची कार्यवाही सुरु आहे व त्याकरिता जास्त श्रमदिनांची आवश्यकता असल्याचे नाशिक जिल्हा सहाय्यक संचालक, श्री भालचंद्र चव्हाण यांनी सांगितले. त्यानुषंगाने प्रस्तुत प्रकरणी विभागाय सहसंचालक नाशिक यांचे प्राधिकारातील श्रमदिनांना मंजरी घेऊन उर्वरित जास्तीच्या श्रमदिनांसाठी संचालनालयास प्रस्ताव पाठविण्यात यावा.

IV. राज्यातील ग्रामपंचायतीचे audit online चे १००% निर्धारित उद्दिष्टपूर्तीसाठी इतर योजनांचे लेखापरीक्षणाबाबत आदेश काढू नयेत याबाबत दिनांक ०२.०५.२०२२ रोजीचे ग्रामविकास विभागाचे पत्र आहे. त्यानुषंगाने जिल्हा परिषद धुळे येथील लघुपाटबंधारे विभागातील जलयुक्त शिवार अंतर्गत ८९ कामाचे विशेष लेखापरीक्षण प्रस्तावाबाबत जिल्हा सहाय्यक संचालक, धुळे यांनी सहाय्यक संचालक, अहमदनगर यांच्याशी संपर्क साधून सदर विशेष लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाकडे न देणेबाबत शासनस प्रस्तावित करावे.

V. विभागीय सहसंचालक औरंगाबाद यांनी श्री माळी व अन्य लेखापरीक्षक यांचेकडे ग्रामपंचायतींचे जास्त अहवाल प्रलंबित असल्यास सदर लेखापरीक्षकांची सुनावणी घ्यावी व त्यांच्या अडचणी सोडवून लेखापरीक्षण विहित वेळेत निर्गमित होतील याबाबत संनियंत्रण ठेवावे.

VI. ग्रामपंचायतीचे अहवालाचे लेखापरीक्षक स्वखर्चाने छायांकित प्रती (Xerox ) काढतात. ते यापुढे बंद करुन याबाबत सहाय्यक संचालक यांनी आकस्मिक खर्चामधून (Contingent expenses) देयके प्रदान करावीत.

VII. संघटनेच्यामागणीस अनुसरुन प्रलंबित ग्रामपंचायती अहवाल /AOL/ग्रामनिधीबाबत सहाय्यक संचालकांनी सविस्तर ग्रामपंचायत निहाय आढावा घ्यावा व ज्या लेखापरीक्षकांचे अहवाल ६ महिन्यापेक्षा जास्त प्रलंबित आहेत त्यांची प्रकरणे सहसंचालकांनी सुनावणी (जिल्हास्तरावर ) घेऊन आपले अभिप्रायसह प्रकरणपरात्वे निकष/अडचणी (तांत्रिक बाबी) विचारात घेऊन संचालनालयास सादर करावीत.

VIII. सर्व साधारणपणे ग्रामपंचायत ग्रामनिधी लेखापरीक्षणासाठी ६० दिवसाची मुदत आहे. तथापी जे लेखापरीक्षक एका जिल्हायातून/विभागातून इतर जिल्हा/विभागात लेखापरीक्षणासाठी गेले होते त्यांचेबाबत (६० ऐवजी ९० दिवसापर्यत) अपवाद म्हणून या लेखापरीक्षणापुरते मुदत वाढविण्यात येत आहे ही बाब सहसंचालक/सहाय्यक संचालक यांनी विचारात घ्यावी.

IX. कर्मचारी अधिका-यांचे प्रलंबित संदर्भ वेतनवाढी /भार-अधिभार PAC / PRC / अनुकंपा भरती बाबत सर्व सहसंचालक व सहाय्यक संचालक यांनी आढावा घेऊन ३१.१०.२०२२ रोजीपर्यत प्रकरणे निकाली काढावीत.

(माधव नागरगोजे) १४/१०/२०२२

**संचालक**

**संचालनालय स्थानिक निधी लेखापरीक्षा,**

**महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.**

**प्रत:- माहितीस्तव तथा पुढील कार्यवाही साठी अग्रेषित** *(Email द्वारे)*

१. **सर्व विभागीय सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा ,कोंकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद /अरामवती /नागपूर.**

२. **सर्व जिल्हा सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा.**